# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला, नवीन इमारत,
वस्तू व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.


**संदर्भः - वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विकवि १२१८/ प्र.क्र. ४४/ वि.प्र. ४, दि. २२.०६.२०१८**

**-: आदेशः-**

**क्रमांकः** विविआ/ आस्था-३/ पुनर्रचना कक्ष/ २०१६ / प्र.क्र. ८९ मुंबई, दि. 30 JUL 2018

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यकर विभाग पुनर्रचना समिती -२०१८ या आठ सदस्यीय समितीची स्थापना करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या समितीचे अध्यक्ष म्हणून मा. श्री. विजयकुमार अग्रवाल, या भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्याची शासनाने नेमणूक केली आहे. या समितीवर मा. श्री. अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली काम करण्यासाठी विभागातील प्रशासकीय व धोरणात्मक बाबींशी संबंध येणाऱ्या खालील पदांवरील सात सदस्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

१) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई [सदस्य]
२) अपर राज्यकर आयुक्त (व्हॅट) २, मुंबई, [सदस्य]
३) राज्यकर सहआयुक्त (मुख्या- ५), वस्तू व सेवाकर, महाराष्ट्र राज्य, मुंबई [सदस्य]
४) राज्यकर सहआयुक्त (मुख्या- ९), आर्थिक बुध्दिसंपदा कक्ष, मुंबई [सदस्य]
५) राज्यकर सहआयुक्त (मुख्या- ११), महाविकास, मुंबई [सदस्य]
६) राज्यकर सहआयुक्त (मुख्या-१०), प्रशिक्षण, मुंबई [सदस्य]
७) राज्यकर सहआयुक्त (मुख्या-४), महाराष्ट्र राज्य, मुंबई [सदस्य सचिव]

या समितीची कार्यकक्षा उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयामध्ये विहीत केल्याप्रमाणे असेल. राज्यकर उपायुक्त (आस्थापना - ३), महाराष्ट्र राज्य, मुंबई हे समितीच्या कामकाजात समन्वय व सहाय्य करतील. या समितीने शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे तिच्या शिफारशी तीन महिन्यांच्या आत शासनास सादर कराव्यात.

त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध कार्यशाखांमधील तज्ञ आणि अनुभवी अधिकाऱ्यांची समितीवर सहयोगी सदस्य (Co-opted members) म्हणून नेमणूक करण्यात येईल.

(राजीव जलोटा)
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत सादरः-** मा.अध्यक्ष, राज्यकर विभाग पुनर्रचना समिती-२०१८.

प्रतः- १) विशेष राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) अपर पोलीस महासंचालक तथा मुख्य दक्षता अधिकारी.
३) सर्व अपर राज्यकर आयुक्त.
४) सर्व राज्यकर सहआयुक्त.
५) राज्यकर आयुक्तांचे विशेष कार्य अधिकारी.
६) संबंधित अधिकारी.
७) निवडनस्ती.
८) स्थळप्रत.